**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र. आरटीएस/अपील/१८२/२०२३

दिनांक –३१.०१.२०२५

**प्रति,**

१. महादू उमला लमाण

रा. धुळकरवाडी. ता. जत जि. सांगली ........................................ अपिलार्थी

**विरुध्द**

१. बशीर अहमद साहेबलाल मुजावर रा. विजयपूर ता. व जि.विजयपूर

२. खातुनबी मैनुद्दीन मकानदार रा. अनंतपुर ता.अथणी जि.बेळगाव

३. अस्लम मैनुद्दीन मकानदार रा. अनंतपुर ता.अथणी जि.बेळगाव

४. अशपाक मैनुद्दीन मकानदार रा. अनंतपुर ता.अथणी जि.बेळगाव

५. दादापिर महमदहनिफ मुजावर रा. रामपूर ता.जत जि.सांगली

६. हासिमपिर महमदहनिफ मुजावर रा. रामपूर ता.जत जि.सांगली

७. अहमदसो दादासो मुजावर आसंगी तुर्क ता.जत जि.सांगली ......................... जाबदार

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. धुळकरवाडी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ११२ या मिळकत प्रकरणी मंडळ अधिकारी संख यांनी फेरफार नंबर १४१४ प्रकरणी तक्रार/रजि/नं./५४/२०२३ दिनांक ०४.०९.२०२३ रोजी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रीतसर नोटीसादेऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो,प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तूत अपिलकामी नोटीस बजाऊन दि.१९.१२.२०२३, १५.०२.२०२४, १२.०३.२०२४, २५.०६.२०२४, ३०.०७.२०२४, २०.०८.२०२४, १२.१०.२०२४, अन्वये म्हणणे मांडणेकामी वारंवार संधी देणेत आली आहे.अपिलार्थी यांचे विधिज्ञ यांना जाबदार यांना नोटीस बजावणी करणे बाबत आदेशित करून ही त्यांनी नोटीस बजावणी कामी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत अपील अपिलार्थी यांना चालविणेचे स्वारस्य दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३२ अन्वये प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकणे आवश्यक असलेचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील चालविणेत स्वारस्य दिसून येत नसल्याने प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.**

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)

**उपविभागीय अधिकारी**

**जत उपविभाग जत**

ठिकाण – जत

दिनांक – ३१.०१.२०२५

**प्रत—अपर तहसिलदार,संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठीरवाना.**